मानोरा रात्रीच्या वेळी महिलेच्या मदतीसाठी धावून आले निर्भया पथक दि. १६/०२/२०२०



रविवार दि. १६ फेब्रुवारी २०२० | लोकमत | ४

संडे स्पेशल...

# रात्रीच्या वेळी महिलेच्या मदतीसाठी धावून आले निर्भया पथक!

## मानोरा येथील प्रकार। गुंडी येथील महिला सुखरुप पोहोचली घरी!

लोकमत न्यूज नेटवर्क

मानोरा : जिल्ह्यात निर्भया पथकातर्फे जिल्हा पोलीस अधीक्षकांच्या मार्गदर्शनात राबविण्यात येत असलेल्या अभिनव उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे. निर्भया पथकाच्या कार्यांची माहिती घरोघरी पोहोचल्याने रात्री उशिरा बस नसल्याने रात्री एकट्या महिलेच्या मदतीसाठी निर्भया पथक धावून आले असून, तिला घरी सुखरुप पोहोचविले.

एका महिलेला निर्भया पथकाच्या कार्यांची जाण झाली आणि त्यांनी तो प्रयोग करुन पाहिला असता पोलिसांचे मोलाचे सहकार्य लाभले. मानोरा तालुक्यातील गुंडी येथील ज्योती गौतम खडसे नामक महिला कौटुंबिक कलहामुळे वाशिम येथील महिला तक्रार निवारण केंद्राकडे १४ फेब्रुवारी रोजी गेली होती. आपले काम आटोपल्यानंतर मानोरा येथे येण्यास तिला रात्रीचे १०.३० वाजलेत. मानोरा येथून रात्री बस नसल्याने आता काय करावे, अशी मनात घालमेल सुरु असताच तिला जिल्हा पोलीस अधीक्षकांनी केलेले आवाहन व निर्भया पथकाच्यावतिने रात्री-बेरात्री होत असलेल्या मदतीची जाण झाली. महिलेने ताबडतोब मानोरा पोलीस स्टेशन गाठून पोलिसांकडे आपबिती कथन केली. पोलीस अधीक्षकांचे आदेशच असल्याने कर्तव्यावर असलेले पोलीस उप-निरिक्षक विजय राठोड यांनी याबाबत पोलीस निरीक्षक शिशिर मानकर यांना कल्पना दिली. त्यांनी ताबडतोब महिला पोलीस प्रियंका भगतसह पोलीस कर्मचारी गजानन शिंदे, बाळु ढगे, शरद सवई यांना महिलेला सुखरुप घरी पोहोचवून देण्याच्या सूचना केल्यात. घरी गेल्याबरोबर घरची मंडळी ज्योतीची प्रतीक्षा करत होती. जसी गाडी घराजवळ थांबली व ज्योतीने सर्व आपबिती सांगितली तेव्हा तिच्या कुटुंबीयांनी साश्रूनयनांनी आभार व्यक्त केले व उपक्रमाबाबत समाधान व्यक्त केले.